माहिती हवीय?

भरत चंद्रकांत कालुवाला, माहीत कॉजवे, मुंबई.

☐ मनोजकुमारचा *पहचान* व जितेंद्रचा *कारवाँ* हे चित्रपट केव्हा पडद्यावर आले होते? कलाकार, संगीतकार व निर्माता-दिग्दर्शक कोण?

— *पहचान* १९७०ला पडद्यावर आला होता. कलाकारः मनोजकुमार, बबिता, बलराज साहनी, शैलेशकुमार, चांद उस्मानी, सुलोचना, तिवारी, सुंदर, असित सेन, मोहन चोटी, लता बोस, डेझी इराणी, संगीतकारः शंकर-जयकिशन, निर्माता-दिग्दर्शकः सोहनलाल कंवर. *कारवाँ* १९७१ला पडद्यावर आला होता. कलाकारः जितेंद्र, आशा पारेख, अरुणा इराणी, हेलन, किशन मेहता, रवींद्र कपूर, मदन पुरी, मनोरमा, मुराद, अन्वर हुसेन, संजाना, शिवराज, मेहमूद (ज्यू.)

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा-गोवा.

☐ गीता दत्तचे बंधू गायक होते काय?

— नाही. ते संगीतकार होते. त्यांचं नाव मुकुल रॉय. त्यांनी *सैलाब*, *डिटेक्टीव्ह* यासारख्या दोन-चार चित्रपटांना संगीत दिलं.

☐ दारूच्या व्यसनामुळे आपलं आयुष्य उद्‌ध्वस्त करून घेणारे कलाकार कोण?

— सायगल, बारुआ, चंद्रमोहन, गुरुदत्त, दिनकर कामण्णा, वसंत पवार, मीनाकुमारी, केस्टो मुखर्जी, शेट्टी, साधना बोस, गीता दत्त यासारखे अनेक.

☐ रफीला किती मुलं होती?

— मुहम्मद सईद, मुहम्मद खालिद, मुहम्मद हमीद, मुहम्मद शाहीद हे चार मुलगे व यास्मिन अहमद, परवीन अहमद, नसरीन अहमद या तीन मुली.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

☐ अनंत माने यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट कोणता? नायक-नायिका कोण?

— १९४९चा *जय भीम* हा हिंदी चित्रपट अनंत मानेंनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट. नायक-नायिका किशोर-रत्नमाला.

☐ गुलजारनी कोणत्या चित्रपटासाठी प्रथम गीतलेखन केलं?

— *बंदिनीत*.

☐ आय. एस. जोहरनी कधी चित्रपटकथा लिहिलीय का?

— जे आधी लेखक होते व नंतर नट व दिग्दर्शक. १९४९च्या *एक थी लडकी*ची कथा लिहूनच त्यांनी आपल्या चित्रपटीय कारकीर्दीची सुरुवात केली.

☐ *राजा भरथरी*, *नौशेरवाने अदिल*, *राजहंस*, *धूपछाँव*, *नाटक*, *संन्यासी*, *रतन*, *दशहरा*, *अटेल जहाँगिर*, *कपालकुंडला* या चित्रपटातील नायक-नायिका, दिग्दर्शक, संगीतकार कोण? हे चित्रपट कोणत्या साली पडद्यावर आले होते?

— *राजा भरथरी* या नावाचा एकही चित्रपट आतापर्यंत निर्माण झालेला नाही. *भरथरी* नावाचे दोन चित्रपट आतापर्यंत आले आहेत. पहिला १९३२ला. नायक-नायिकाः अश्रफ खान-झेबुन्नीसा. दिग्दर्शकः ए. पी. कपूर, संगीतकार कोण याची माहिती उपलब्ध नाही. १९४४ला दुसरा *भरथरी* आला होता. नायक-नायिकाःसुरेंद्र-मुमताज शांती, दिग्दर्शकःचतुर्भुज दोशी. संगीतकारः खेमचंद प्रकाश. *नौशेरवान आदिल* १९५७ला होता. नायक-नायिकाः सोहराब मोदी-नस्सीम, राजकुमार-माला सिन्हा. दिग्दर्शकः सोहराब मोदी, संगीतकारः सी. रामचंद्र, *राजहंस* १९५६ला आला होता. नायक-नायिकाः प्रदीपकुमार-मधुबाला, दिग्दर्शकः सोहराब मोदी. संगीतकारः शंकर-जयकिशन, *धूपछाँव* या नावाचा चित्रपट तीनदा आला. १९३५ला पहिला. नायक-नायिकाः पहाडी संन्याल-उमादेवी, दिग्दर्शकः नितीन बोस, संगीतकारः आर. सी. बोराल व पंकज मलिक. १९५४ला दुसरा. नायक-नायिकाः भारत भूषण-श्यामा, दिग्दर्शकः एस. एम. रझा, संगीतः अझीझ हिंदी, १९७७ला तिसरा. नायक-नायिकाः संजीवकुमार-हेमामालिनी, दिग्दर्शकःप्रल्हाद शर्मा, संगीतकारः शंकर-जयकिशन, *नाटक* नावाचा चित्रपट दोनदा आला. १९४७ला पहिला. नायक-नायिकाः अमर-सुरैया, दिग्दर्शकः एस. यू. सनी, संगीतकारः नौशाद. १९७९ला दुसरा. नायक-नायिकाः विजय अरोरा-मौसमी चटर्जी, दिग्दर्शकः सोहनलाल कंवर, संगीतकारः लक्ष्मीकांत प्यारेलाल. *संन्यासी* नावचा चित्रपटही दोनदा आला. १९४५ला पहिला. नायक-नायिकाः अमर-शमीम. दिग्दर्शकः कारदार, संगीतकारः नौशाद. १९७५ला दुसरा. नायक-नायिकाः मनोजकुमार-हेमामालिनी, दिग्दर्शकः सोहनलाल कंवर, संगीतः शंकर-जयकिशन. *रतन* १९४४ला आला होता. नायक-नायिकाः करण दीवाण-स्वर्णलता. दिग्दर्शकः एम. सादिक, संगीतकारः नौशाद. *दशहरा* १९५६ला आला होता. नायक-नायिकाः शाहू मोडक-निरुपा रॉय, दिग्दर्शकः चतुर्भुज दोशी, संगीतकारः एन. दत्ता. *अरले जहाँगिर* दोनदा आला होता. १९३४ला पहिला, नायक-नायिकाः कांतीलाल-पुष्पा, दिग्दर्शकः के. सरदार, संगीतकारः इशरत सुलतान. १९५६ला दुसरा, नायक-नायिकाः प्रदीपकुमार-मीनाकुमारी, दिग्दर्शकः जी. पी. सिप्पी, संगीतकारः हुस्नलाल. *भगतराम*, *कपालकुंडला* १९३९ला आला होता. नायक-नायिकाः नजमल हुसेन-लीला देसाई, दिग्दर्शकः फणी मजूमदार, संगीतकारः पंकज मलिक.

संजीवनी अनंता कोळी, अंतोरे, पेण.

☐ धर्मेंद्रचा पहिला हिट चित्रपट कोणता? नायिका कोण?



फूल और पत्थरमध्ये मीनाकुमारी - धर्मेंद्र

— १९६६चा *फूल और पत्थर* धर्मेंद्रचा पहिला हिट चित्रपट, नायिका मीनाकुमारी.

अशोक वा. कोर्टीकर, पंढरपूर.

☐ १९८० नंतर 'दिल' हा शब्द असलेले कोणकोणते चित्रपट निर्माण झाले?

— *दिल*, *दिल आखिर दिल है*, *दिल अपना और प्रीत पराई*, *दिल आशना है*, *दिल है बेताब*, *दिल है के मानता नही*, *दिल ही दिल में*, *दिल ही तो है*, *दिल का डॉक्टर*, *दिल का क्या कसूर*, *दिल का साथी दिल*, *दिल के झरोखे में*, *दिल की बाजी*, *दिल से*, *दिल तेरा आशिक*, *दिल तेरा दीवाना*, *दिल तो पागल है*, *दिल तुझको दिया*, *दिले नादान*, *दिलवर दिलवर*, *दिलजला*, *दिलजले*, *दिलरुबा टांगेवाली*, *दिलवाला*, *दिलवाले*, *दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे*, *दिलवाले कभी ना हारे*, *दिल चाहता है*.

सोहेल लहू कोळी, वरेडी.

☐ भारत-पाक समस्येवर निर्माण झालेले चित्रपट कोणते?

— *जोहर इन काश्मीर*, *गर्म हवा*, *सरफरोश*, *बॉर्डर*, *गदर*. ●